# पोलीस आयुक्तालय,नवी मुंबई

**CB/54/2025**

## प्रेसनोट

गुन्हे शाखा, नवी मुंबई — दिनांक २६/०९/२०२५

## नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाकडुन २६.४८ कोटींचे अंमली पदार्थ नष्ट

..........................................................................................................................................

**नशा मुक्त नवी मुंबई अभियान** या कार्यक्रमाअंतर्गत नवी मुंबई पोलीस आयुक्तायकडुन दिनांक २६/०९/२०२५ रोजी पर्यंत **७९ गुन्हयातील एकुण ११ कोटी ६१ लाख** रुपयांचे अंमली पदार्थ नष्ट करण्यात आले होते.

नशा मुक्त नवी मुंबई अभियान कार्यक्रमाच्या पुढील टप्यात **आज दिनांक २६/०९/२०२५ रोजी** एकुण **३५ गुन्हयातील जप्त करण्यात आलेला २६ कोटी ४८ लाख रुपयांचा अंमली पदार्थ** शासन मान्य मुंबई वेस्ट मॅनेजमेंट कंपनी, तळोजा एम.आय.डी.सी., ता.पनवेल, जि.रायगड या ठिकाणी **मा. आमदार सौ. मंदाताई म्हात्रे, पोलीस सह आयुक्त श्री.संजय येनपुरे, अपर पोलीस आयुक्त, श्री.दिपक साकोरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री.सचिन गुंजाळ** यांचे उपस्थितीत नष्ट करण्यात आला.

सन २०२३, २०२४ व २०२५ मध्ये अंमली पदार्थाचे सेवन व विक्री करणा-या आरोपी विरोधात एकुण **१८३१ गुन्हे दाखल करुन २८५४ आरोपींना अटक** करण्यात आली असुन त्यांच्याकडुन एकुण **७०.१८ कोटी रुपयांचा अंमली पदार्थाचा माल जप्त** करण्यात आला आहे. त्यामध्ये एकुण **१०१ आफ्रिकन नागरीकांना अटक** करण्यात आली असुन त्यांचेकडुन एकुण ४० कोटी रुपयांचा अंमली पदार्थाचा माल जप्त करण्यात आला आहे.

तसेच सन २०२३, सन २०२४ व सन २०२५ मध्ये नवी मुंबई मध्ये अवैधरित्या राहत असलेल्या आफ्रिकन नागरीकांवर कारवाई करण्यात आली आहे. एकुण **२०३४ आफ्रिकन नागरीकांना भारत देशातुन हद्दपार करुन परत पाठविले आहे. त्यापैकी ९८९ आफ्रिकन नागरीकांना ब्लॅकलिस्टेड** करण्यात आले आहे.

अंमली पदार्थाचा मोठया प्रमाणात व्यवसाय करणा-या **०७ आरोपींविरूध्द महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (MCOCA) अंतर्गत कारवाई** करण्यात आली आहे. तसेच नवी मुंबई पोलीस आयुक्तालय परिसरात अंमली पदार्थ व्यवसाय करणा-या सराईत गुन्हेगारांवर **PITNDPS अंतर्गत कारवाई होणेकरीता ०३ प्रस्ताव शासनाकडे** मंजुरीकरीता पाठविण्यात आले आहेत.

शासनाच्या धोरणानुसार अंमली पदार्थ विरोधी कारवाई अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी नवी मुंबई पोलीस आयुक्त श्री.मिलिंद भारंबे यांचे संकल्पनेतुन व पुढाकाराने **नशा मुक्त नवी मुंबई अभियानाची सुरूवात दिनांक ०८/०१/२०२५ रोजी मा.ना.श्री.देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य** यांचे उपस्थितीत करण्यात आली.

सदर कार्यक्रमामध्ये नवी मुंबई परिसरातील नागरीकांना मोठया प्रमाणात सहभागी करून, अंमली पदार्थाचे दुष्परिणामाचे अनुषंगाने शहरामध्ये ठिकठिकाणी बॅनर्स, होर्डींग्ज लावण्यात आले असून, शाळा-कॉलेज/ सोसायटी या ठिकाणी जावून लोकांमध्ये अंमली पदार्थाविषयी जनजागृती करण्यात येत आहे.

अंमली पदार्थाच्या अनुषंगाने पोलीसांना माहिती देण्याकरीता **८८२८ ११२ ११२ हा हेल्पलाईन नंबर** नागरीकांसाठी सुरू करण्यात आला आहे. माहिती देणा-या नागरिकांची ओळख गोपनिय ठेवण्यात येते.

★★★★★★★★★★